N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस स्टेशन: मेहकर, जि.बुलडाणा

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District** (जिल्हा): बुलढाणा    **P.S.**(ठाणे): मेहकर
**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0291    **Year** (वर्ष): 2026
**Date and Time of FIR** (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):17/04/2026 01:53

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):
1. **Day**(दिवस): गुरूवार    **Date From** (दिंनाक पासून): 16/04/2026
**Time Period** (कालावधी): पहर 6    **Date To** ( दिंनाक पर्यंत): 16/04/2026
**Time From** (वेळेपासून): 16:39 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 16:57 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
**Date** (दिंनाक ): 17/04/2026    **Time** (वेळ): 01:43 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):
**Entry No.** (नोंद क्र.): 002
**Date & Time** (दिंनाक आणि वेळ): 17/04/2026 01:43 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):
1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
पश्चिम, 4 किमी    **Beat No.** (बिट क्र.):
(b) **Address** (पत्ता): उपविभागीय अधिकारी कार्यालय मेह

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): जगदीश प्रल्हाद परदेशी

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1980

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग वाशिम,वाशिम,मेहकर,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग वाशिम,वाशिम,मेहकर,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7507055205

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | कैलास भगवान मुरकूट | | | 1. बालाजी नगर, डोणगाव रोड मेहकर,मेहकर,मेहकर,बुलढाणा, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इनक्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद कॅम्प - मेहकर दिंनाक:- 17/04/2026मी जगदीश प्रल्हाद परदेशी, वय 46 वर्ष, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग वाशिम, मो.नं.7507055205 मी आज रोजी सरकारतर्फे समक्ष फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिंबध विभाग वाशिम येथे पोलीस उपअधिक्षक म्हणुन 29/05/2025 पासुन कार्यरत आहे. दि.16/04/2026 रोजी सकाळी मा.पोलीस अधिक्षक ला.प्र.वि.अमरावती यांनी मला तक्रारदार यांचा फोन नंबर पाठवुन तक्रारदार यांचेशी संपर्क करुन त्याचे तक्रारी संबधाने कारवाई करण्याच्या फोनव्दारे सुचना दिल्या त्यावरुन मी तक्रारदार यांचे फोनवर फोन केला असता त्यांनी मला लोकसेकाविरुध्द लाच मागणी बाबत तक्रार असल्याचे सांगीतले. तसेच तक्रारी करीता आजच मेहकर जि.बुलढाणा येथे भेटण्याचे सांगीतले त्यावरुन आम्ही मा.जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय वाशिम यांना पत्र देउन दोन शासकिय पंच उपलब्ध करुन घेतले.

दि.16/04/2026 रोजी आम्ही,सापळा पथक व पंच असे शासकिय चारचाकी वाहन क्र. MH-37-AH-3959 ने मेहकर करीता रवाना झालेवर मी तक्रारदार यांना त्यांचे मोबाईल फोनवर संपर्क केला असता त्यांनी मेहकर ते चिखली रोडवर लोणार फाटा मेहकर येथे येण्याकरीता सांगीतले.चिखली रोडवर अॅड.जायभाये नावाने घरासमोर बोर्ड लावले असल्याचे सांगीतले. आम्ही सर्व तक्रारदार यांनी सांगीतलेल्या ठिकाणी त्यांचे राहते घरी जाउन तक्रारदार यांची भेट घेतली असता त्यांनी त्यांचे नाव श्री विनायक कैलाषराव जायभाये वय 23 वर्ष, व्यवसाय वकीली, रा.लोणार फाटा, मेहकर ता.मेहकर जि.बुलढाणा असे सांगीतले तसेच घरामध्ये हजर असलेले ईसम श्री कैलाषराव जायभाये हे त्यांचे वडील असुन त्यांचा परीचय करुन दिला. त्यावेळी आम्ही त्यांना सापळा पथक तसेच दोन्ही पंचांची ओळख करुन देवुन त्यांची तक्रार नोंदवुन घेतली ती पुढीलप्रमाणे, " मी तक्रार लिहुन देतो कि, मौजे महार चिकना, ता.लोणार जि.बुलढाणा गट नं 103 मधील जमीनीचे फेरफार (फे.फा.423-अ) रद्द करणेकामी माझे पक्षकार यांनी (माझे चुलत आजोबा) नामे संतकृपा वारकरी संप्रदाय संस्था मेहकर यांचे तर्फे उपविभागीय अधिकारी मेहकर यांचे कार्यालयात अपील दाखल करण्यात आली आहे. सदर संस्थेचे कायदेशीर बाबी बघण्यासाठी मला वकीलपत्र देण्यात येऊन माझी नेमणुक करण्यात आली आहे. त्याआधारे मी संस्थेच्या सर्व कायदेशीर बाबी पाहत असतो. वरील संबधाने दि.10.06.2025 रोजी अपील दाखल केल्यानंतर सदर प्रकरणात सर्व पुरावे व युक्तीवाद झाल्यानंतर जानेवारी 2026 मध्ये प्रकरणावर सुनावनी होवुन अंतीम आदेशाकरीता बंद करण्यात आले. माझ्या माहिती नुसार आमचे अपीलावर दि.23.02.2026 रोजी आदेश झालेला असुन मला झालेल्या आदेशाची मुळ प्रत आवश्यक होती. त्यामुळे आदेशाची प्रत मिळण्याकरीता मी दि.02.03.2026 रोजी नक्कल विभागात संबधीत बाबु यांना अर्ज दिला होता. त्यावर संबधीत बाबु यांनी आर सी 1 एसडीएम ऑफिस मुरकूट सर असा शेरा लिहुन त्याखाली 02 मार्च 2026 असा तारखेचा शिक्का मारुन मला मुरकूट साहेब यांना भेटा असे सांगीतले. त्यांनतर मी सरदचा अर्ज घेवुन मुरकूट यांना भेटलो असता त्यांनी सदरचा अर्ज घेण्यास नकार देवुन नंतर भेटण्यास सांगीतले. त्यानंतर मी पुन्हा सदर आदेशाची मुळप्रत मागण्यासाठी दि.13.04.2026 रोजी श्री.मुरकूट साहेब यांच्याकडे गेलो होतो. तेंव्हा श्री.कैलास मुरकूट (प्रस्तुतकार -1) यांनी मला आमचे प्रकरणात झालेल्या आदेशाची मुळ प्रत देण्यासाठी 20,000/-रुपये मागणी केली आहे. मला माझ्या प्रकरणाच्या अपीलावर झालेल्या आदेषाच्या मुळ प्रतीची आवष्यकता आहे. त्यामुळे मी श्री.मुरकूट यांना 20,000/-रु माझी इच्छा नसतांना नाईलाजाने देण्याचे कबुल केले आहे. अपीलावर झालेल्या आदेशाची प्रत देण्याकरीता कुठलिही शासकिय फि लागत नाही हे मला माहित आहे. मुरकूट यांनी मागीतलेली 20,000/-रु रक्कम ही लाच म्हणून मागत असल्याची मला खात्री झाली आहे. श्री. मुरकूट (प्रस्तुतकार -1) उपविभागीय अधिकारी कार्यालय मेहकर यांच्याशी माझा कोणताही देण्याघेण्याचा किंवा उसणवारीचा व्यवहार नसून आपसी दुश्मनी नाही. श्री.मुरकूट (प्रस्तुतकार -1) यांच्यावर कार्यवाही करावी या करीता तक्रार देत आहे. कारवाही होण्यास विनती आहे. तक्रार सोबत मी अपीलाची व इतरसंबधीत कागदपत्राची झेरॉक्स

प्रत सोबत देत आहे. अशी तक्रार तक्रारदार यांनी लिहुन दिली. तक्रारदार यांनी लिहुन दिलेली तक्रार व कथन केलेली तक्रार बरोबर असल्याने सदर तक्रारीवर तक्रारदार, दोन्ही पंचांनी व समक्ष म्हणुन मी तक्रार वाचुन त्यावर सहया केली.आम्ही तक्रारदार व पंच क्र.01 यांना सूचना दिली की, श्री.मुरकूट (प्रस्तुतकार -1) हे तक्रारदार यांना मौजे महार चिकना, ता.लोणार जि.बुलडाणा गट नं.103 मधील जमीनीचे फेरफार (फे.फा.423-अ) रद्द करणेकामी तक्रारदार यांचे पक्षकार यांनी संतकृपा वारकरी संप्रदाय संस्था यांचे तर्फे उपविभागीय अधिकारी मेहकर यांचे कार्यालयात दाखल केलेल्या अपीलावर दि.23.02.2026 रोजी झालेल्या आदेशाची मुळ प्रत देण्याकरीता 20,000/- रु. लाचेची मागणी करतात किंवा कसे? याबाबत तक्रारदार व पंच क्र.01 यांना श्री.मुरकूट (प्रस्तुतकार -1) साहेब यांची भेट घेवून बोलणी करणेकरीता उपविभागीय अधिकारी कार्यालय मेहकर येथे जाउन श्री मुरकूट यांची भेट घेउन बोलनी करावी. तक्रारदार यांना त्यांचे काळया कोटाच्या आतील खिशात व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन ठेवले व पंच क्र.01 यांचे सह श्री.मुरकूट (प्रस्तुतकार -1) यांचे भेटीकरीता पाठविले. काही वेळाने तक्रारदार व पंच क्र.01 हे आम्ही थांबलेल्या ठिकाणी म्हणजे तक्रारदार यांचे घरी आले. पडताळणी दरम्यान तक्रारदार व श्री.मुरकूट (प्रस्तुतकार -1) यांची उपविभागीय अधिकारी कार्यालय मेहकर येथे भेट झाली भेटी दरम्यान पंच क्र.01 व तक्रारदार यांना घडलेल्या घटनेबाबबत विचारपुस केली असता त्यांचे सांगणे प्रमाणे तक्रारदार यांनी कामा संबधी बोलणी केली त्यामध्ये तक्रारदार यांनी गै.अ.मुरकूट यांना मुरकुट साहेब आज आहे का...थोडा वेळ आहे का असे म्हटले असता गै.अ.मुरकूट यांनी काय होत असे म्हटले. त्यावर तक्रारदार यांनी गै.अ.मुरकूट यांना महारचिकणा 103 त्यादिवशी पण आपलं तेच म्या तुम्हालं तेच म्हणलं असे म्हटले.गै.अ.मुरकूट यांनी तक्रारदार यांना हो ते घ्यानं घेउन या तुम्ही असे म्हटले. त्यावर तक्रारदार यांनी गै.अ.मुरकूट यांना याचं जर बोलले असते तं असे म्हटले असता गै.अ.मुरकूट यांनी तक्रारदार यांना कशाच याचं... त्यादिवशीच बोललो नं....आता एकचं.... असे म्हटले. त्यावर तक्रारदार यांनी मुरकूट यांना बर मलं सागांन हे तं भानगड काय हे...अमाउंट ची अडचन येते बाकी काही नाही.. असे म्हटले. मुरकूट यांनी तक्रारदार यांना घेउन या तुम्ही...करुन टाकु असे म्हटले. दरम्यान मुरकूट यांनी हातातील पेनाने तक्रारदार यांचे हातावर 20 चा आकडा लिहीला आणि तक्रारदार यांना अरे पेन नाही चालायला असे म्हटले. त्यावर तक्रारदार यांनी मुरकूट यांना पेन नाही चालंत हे...म्हणजे पाहा.... हातावरील 20 चा आकडा पाहून तक्रारदार यांनी विस हजार असे म्हटले. त्यावर मुरकूट यांनी तक्रारदार यांना पटकण द्या टाईमपास नका करु .. तेचातनी लय अपेक्षा होती असे म्हटले. त्यावर तक्रारदार यांनी मुरकूट यांना जास्त होतात न..जास्त होतात विस जरासेक असे म्हटले. त्यावर मुरकूट यांनी तक्रारदार यांना नाही...व्यवस्थित हे डोकं नका लावू आणा पटकणं करुन देवू असे म्हटले. त्यावर तक्रारदार यांनी मुरकूट यांना तेवढयात होउन जाईल? ओके बोलु त्यांना...बोलु त्यांना डायरेक्ट असे म्हटले. त्यावर मुरकूट यांनी तक्रारदार यांना हो बिलकुल पटकण असे म्हटले. त्यावर तक्रारदार यांनी मुरकूट यांना आज आजचं करसालं असे म्हटले असता मुरकूट यांनी तक्रारदार यांना होय असे म्हणून20,000/-रु लाचेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शविली. यावरुन श्री.मुरकूट (प्रस्तुतकार -1) उपविभागीय अधिकारी कार्यालय मेहकर यांनी तक्रादार यांना तक्रारदार यांनी दाखल केलेल्या प्रकरणाच्या अपीलावर झालेल्या आदेशाच्या मुळ प्रत देण्यासाठी 20,000/- रु. लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. व सदर लाचरक्कम ही काही वेळाने म्हणजे दि.16/04/2026 रोजीच स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दि.16/04/2026 रोजी श्री. मुरकूट (प्रस्तुतकार -1) उपविभागीय अधिकारी कार्यालय, मेहकर यांचेवर सापळा कारवाई ही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. दि.16/04/2026 रोजी सापळा कारवाई करीता आम्ही पो.उप.अधि.जगदीश परदेशी, लाप्रवि पथक, दोन्ही पंच व तक्रारदार असे सापळा कारवाई करीता तक्रारदार यांचे मेहकर येथील घरी हजर असतांना आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांना 20,000/- रु लाच रक्कम हजर करण्यास सांगीतली असता. तक्रारदार यांनी 20,000/- रु लाच रक्कम हजर केली. त्यामुळे सापळा कारवाई दरम्यान श्री.मुरकूट (प्रस्तुतकार -1) यांना 20,000/- रुपये देण्याचे ठरले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या 20,000/- रु रक्कमेस अन्थ्रॉसिन पावडर लावण्यात आली. सापळा कारवाई ही उपविभागीय अधिकारी कार्यालय, मेहकर येथे आयोजीत करण्यात येणार असल्याने तक्रारदार यांना लाच रक्कमेसह तसेच व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांचे काळया कोटाचे आतील बाजुतील खिशात ठेवले. तसेच त्यांचे पाठोपाठ आम्ही सापळा पथक शासकीय वाहनाने लगेच उपविभागीय अधिकारी कार्यालय, मेहकर येथे जाउन सापळा कारवाईचे पथक सापळा लावुन दबा धरुन बसले. सापळा कारवाई दरम्यान श्री.मुरकूट (प्रस्तुतकार -1) यांनी तक्रारदार यांना म्हटले की, "या इकडं.." असे बोलुन तक्रारदार यांना मुरकूट यांनी त्यांचे कायालीन कामकाज असलेल्या रुम मधुन दुस-या रुम मध्ये नेले. तेथ तक्रारदार म्हणाले की, " विस हजार हेतं " आलोसे मुरकूट (प्रस्तुतकार -1) यांनी तक्रारदार यांचेकडुन अंदाजे 16 :55 वाजताचे सुमारास 20,000/- रुपये स्विकारले. तक्रारदार यांनी पुर्वी ठरल्याप्रमाणे त्यांनी परीधान केलेला काळा कोट काढुन हातातध्ये घेतला व लाच रक्कम स्विकारलेबाबत पूर्व नियोजीत इशारा केला. त्यावरुन तात्काळ आम्ही, सापळा

पथक असे आलोसे मुरकूट यांचेजवळ पोहचुन मुरकूट यांना 20,000/रु लाच रक्कमेसह ताब्यात घेवुन त्यांच्या कडुन लाच रक्कम हस्तगत केली. आलोसे मुरकूट (प्रस्तुतकार -1) यांना ताब्यात घेतले व पुढिल कारवाई करीता पो.स्टे.मेहकर येथे आणण्यात आले.आलोसे कैलास भगवान मुरकूट वय 46 वर्ष, पद- सहायक महसुल अधिकारी तथा प्रस्तुतकार -1, उपविभागीय अधिकारी कार्यालय मेहकर जि.बुलढाणा. रा.बालाजी नगर, डोणगाव रोड मेहकर ता.मेहकर जि.बुलडाणा यांनी तक्रारदार यांना मौजे महार चिकना, ता.लोणार जि.बुलडाणा गट नं.103 मधील जमीनीचे फेरफार (फे.फा.423-अ) रद्द करणेकामी तक्रारदार यांचे पक्षकार चुलत आजोबा यांनी संतकृपा वारकरी संप्रदाय संस्था यांचे तर्फे उपविभागीय अधिकारी मेहकर यांचे कार्यालयात दाखल केलेल्या अपीलावर दि. 23.02.2026 रोजी झालेल्या आदेशाची मुळ प्रत देण्याकरीता दि.16/04/2026 रोजी पडताळणी कारवाई दरम्यान 20,000/- रुपये लाचेची मागणी करुन दि.16/04/2026 रोजी सापळा कारवाई 16.39 वा. ते 16.57 वा. दरम्यान 20,000/- रुपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली. त्यांचे हे कृत्य कलम 7 भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम 1988 प्रमाणे होत असल्याने माझी त्यांचे विरुध्द सरकातर्फे कायदेषिर फियाद आहे

(जगदीश परदेशी)
पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि.वाशिम

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

venkateshwar sugriv alewar(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

N.C.R.B (एन.सी...

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फ...

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station** पोलीस स्टेशन, मेहकर
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** venkateshwar sugri...

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** पोलीस स्टेशन, मेहकर
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** venkateshwar sugri
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्य ा खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)